# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/२११२ दिनांक : २० नोव्हेंबर,२०००

## परिपत्रक क्र. ५४

**विषय** : निविदा स्वीकृतीच्या वेळेस घेण्यात येणारी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबत.

**संदर्भ** : दि.३/२/१९९८ चे पत्र क्र.जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३३३.

काही कंत्राटदारांकडून सादर करण्यात येणारे निविदांचे देकार निविदेच्या अंदाजीत किंमतीपेक्षा खूपच कमी दराने सादर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्याने त्याचा परिणाम कामाच्या गुणवत्तेवर होवू नये, तसेच सादर करण्यात आलेला देकार बराच कमी दराचा असल्याने काम न परवडल्याने कालांतराने कंत्राटदाराने कामे सोडून देणे, परिणामी योजनेची कामे रखडणे असे प्रकार टाळण्याच्या उद्देशाने जे देकार निविदेतील दरांपेक्षा १०% कमी वा त्यापेक्षा अधिक कमी दराचे आहेत त्या देकारांच्या स्वीकृतीच्या वेळी कंत्राटदारांकडून अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम घेण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला होता. हा निर्णय टँकरमुक्ती कार्यक्रमाची समयबध्द अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने घेण्यात आला होता. याबाबतच्या सूचना संदर्भीय परिपत्रकानुसार निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. उपरोक्त परिपत्रकाच्या अधिन राहून घेण्यात येणारी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम कशा पध्दतीने परत करावी याचे निर्देश देण्याचे प्राधिकरणाच्या विचाराधीन होते. या अनुषंगाने दि.१०/१०/२००० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ८८ व्या बैठकीमध्ये कार्यक्रम बाब सादर करण्यात आली होती. या कार्यक्रम बाबीत दिलेल्या मुद्यांवर साधकबाधक चर्चा करण्यात येवून घेण्यात आलेल्या निर्णयानुसार आपणास खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. अशा सूचना देत असताना अशा प्रकरणी विदर्भ विकास महामंडळाकडून अवलंबण्यात येणाऱ्या कार्यप्रणालीचाही विचार करण्यात आला आहे.

१. एकूण कामाच्या ५०% पेक्षा कमी काम झाल्यास – अतिरिक्त सुरक्षा अनामत अजिबात परत करु नये.

२. ५०% च्या पुढे जसजसे काम होत जाईल तसतशी कामाच्या प्रमाणात सुरुवातीस घेतलेली अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यात यावी.

....२....

३. जी कामे ७५% च्या वर पूर्ण झाली आहेत व निधीच्या अनुपलब्धतेमुळे रेंगाळत सुरु आहेत त्यांचेबाबत संपूर्ण अतिरिक्त सुरक्षा अनामत परत केली जावी.

४. वरीलप्रमाणे अतिरिक्त सुरक्षा अनामत परत करतांना ती रोखीने करावयाची नसून परत करावयाच्या अनामत रकमे इतक्या रकमेची बँक गॅरंटी ठेकेदारास परत करावयाची आहे.

काम त्याप्रमाणात पूर्ण झाले असल्याचा दाखला तसेच निधीच्या अनुपलब्धतेमुळे ७५% चे पुढे काम रेंगाळले आहे हे किमान अधीक्षक अभियंता स्तरावरील अधिकाऱ्याने प्रमाणित केल्यासच क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत उपरोक्त ४ प्रमाणे ठेकेदारास परत करावी.

**<u>टीप</u> :-** एखादे काम ५५% पूर्ण झाले असेल तर परत करावयाची अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम ही वसुल करण्यात आलेल्या अतिरिक्त सुरक्षा अनामत रकमेच्या ५५% असेल.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन व्हावे.

राजसगणे

**(राजेंद्र सगणे)**
**सदस्य सचिव(तांत्रिक)**

प्रत : मा.मंत्री,ग्राम विकास ,पाणी पुरवठा व स्वच्छता ,मंत्रालय,मुंबई,यांचे माहितीसाठी सादर.
मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता,मंत्रालय,मुंबई,यांचे माहितीसाठी सादर.
मा.राज्यमंत्री,नगर विकास,मंत्रालय,मुंबई,यांचे माहितीसाठी सादर.
प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई,यांचे माहितीसाठी सादर.
सदस्य सचिव(प्रशासन व बाहय अर्थसहाय्य),म.जी.प्रा.,मुंबई,यांचे माहितीसाठी.
प्रधान महालेखाकार(लेखा परिक्षा)१,महाराष्ट्र,१०१ महर्षी कर्वे रोड,चर्चगेट,यांचे माहितीसाठी.
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,नवी मुंबई,यांचे माहितीसाठी.
सर्व मुख्य अभियंता,म.जी.प्रा.,यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई,यांचे माहितीसाठी.
सर्व अधीक्षक अभियंता,म.जी.प्रा.मंडळ,यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व कार्यकारी अभियंता,म.जी.प्रा.बांधकाम विभाग,यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

M. J. P.
ISSUED
21 NOV 2000
MUMBAI-21